ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

# स्वातंत्र्योत्तर काळातील प्रमुख चळवळी

**प्रा.सागर मा.कांबळे**

**मराठी विभाग**

**अण्णासाहेब मगर महाविद्यालय,हडपसर,पुणे.२८**

**प्रस्तावना-**

परिवर्तनाच्या चळवळींचा समृद्ध वारसा भारत देशाला आहे. भारतीय समाज व्यवस्थेच्या काही सामाजिक व धार्मिक प्रथा अविभाज्य अंग होत्या, तसेच त्या भारतीय समाजमनामध्ये खोलवर रुजलेल्या होत्या.ज्यामध्ये सतीप्रथा,बालविवाह, जरठ कुमारी विवाह, नरबळी, स्त्रिया व त्यांचे प्रश्न , अस्पृश्यता, जातीप्रथा इ.चा समावेश होता. या सामाजिक प्रश्नांविरूद्ध संत आणि समाज सुधारकांनी आवाज उठवला आणि त्या नामशेष करण्यासाठी लढा दिला. ब्रिटीशांचा भारतात एकछत्री अंमल सुरु झाला होता . तत्कालीन राज्यकर्ते असणाऱ्या ब्रिटीश सरकारनेही सकारात्मक पावले उचलून अशा रुढींना पायबंद घालण्यास हातभार लावला.अशा या सामाजिक चळवळींचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणात झाला, त्या सामाजिक चळवळींचा आशय जनसामान्यांपर्यंत पोहोचून चळवळींचा लोकाश्रय वाढला. ही महाराष्ट्राची परंपरा जुनी आहे. तिला वारकरी संप्रदाय व इतर परिवर्तनवादी विचारांचा समृद्ध वारसा आहे. तसेच आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये मैलाचा दगड ठरलेल्या अनेक परिवर्तनवादी चळवळींची तात्विक बैठक आणि परंपरा ही या सामजिक चळवळींची पाठीमागे आहे.

भारतीय संविधानाने जनतेला स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, सामाजिक न्याय या मानवी मूल्यांची शाश्वती आपल्या प्रस्तावनेत दिली. कायद्यासमोर सर्व समान आहेत. कायदा सर्वांसाठी समान आहे किंवा हे कायद्याचं राज्य आहे, अशी खात्री संविधानाने दिली.मुलभूत हक्क आणि अधिकार प्रदान केले. स्वातंत्र्य मिळाले मात्र त्याची फळं मात्र जनतेला अजून मिळाली नव्हती.काही मूठभर लोकांच्या हाती सत्ता, संपत्ती, राजकारण आणि सांकृतिक सत्ता एकवटली होती.राजसत्ता मूठभर लोकांच्या हातचे कळसूत्री बाहुले बनली होती. अशा वेळी संविधानातले मुलभूत हक्क आणि अधिकार मिळवण्यासाठी आपल्याच देशातल्या सत्तेशी लढावे लागत होते.त्यातून शेतकरी, कामगार , विद्यार्थी अशा वर्गीय चळवळी निर्माण झाल्या त्यामध्ये मुख्यतःमार्क्स,फुले, गांधी ,आंबेडकर, लोहिया या विचारांचा प्रभाव होता. समाजवादी चळवळीसोबतच सामाजिक परीघावरच्या अनेक समाजघटकांवरच्या अन्याय अत्याचारांमध्ये प्रचंड वाढ झाली आणि त्यातून शोषितांच्या चळवळी जन्माला आल्या. या वर्गीय आणि सामाजिक चळवळींनी अन्यायाला वाचा फोडली आणि तो आवाज गाण्यांच्या माध्यमातून ,साथीला डफ घेऊन अहिंसात्मक मार्गाने व्यवस्थेला प्रश्न विचारत, नव्हे तर जाब विचारत जनसामान्यांपर्यंत पोचवला. त्यामध्ये सरकारची धोरणं असो कि मग सामाजिक अन्यायाच्या प्रश्नाला वाचा फोडून तो जगाच्या वेशीवर टांगणे असेल, सामाजिक असंतोषाला वाट करून देण्याचे काम या सामाजिक चळवळींनी केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक संघर्षाचे स्वरूप बदलले. सत्ता आता आपल्याच लोकांच्या हातात एकवटली होती. संविधानाने भारतीय जनतेला कल्याणकारी, कायद्याच्या राज्याची शाश्वती आणि हमी दिली. सामाजिक, आर्थिक, राजनैतिक न्याय तसेच समानतेची, दर्जाच्या संधीची ही ग्वाही दिली. मात्र संविधान राबवणाऱ्या हातांनी त्याच्या बरोबर उलट वागायला सुरुवात केली. संविधान, राज्य हे विचारप्रधान असावे असा आग्रह धरते, मात्र राज्यकर्ते मात्र व्यक्तिप्रधान होत गेले.

## संयुक्त महाराष्ट्र चळवळ

महाराष्ट्र ही पुरोगामी विचारांची जन्मभूमी आहे.स्वातंत्र्योत्तर काळात विविध सामाजिक चळवळींचे प्रेरणास्थान महाराष्ट्रच राहिले आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर भाषावार प्रांतरचनेनुसार राज्यांची निर्मिती करताना महाराष्ट्रावर अन्याय झाला. बेळगाव, कारवार, निपाणी, डांग, उमरगाव, गोव्यासह संयुक्त महाराष्ट्राची निर्मितीची मागणी जोर धरू लागली.तत्कालीन मध्यवर्ती सरकारने अगोदर आंध्र प्रदेश राज्याला भाषा या आधारावर मान्यता दिली होती. मात्र महाराष्ट्राला देण्यास ते तयार होत नव्हते. त्यात मुंबई ही गुजरातला जोडण्याचा डाव तत्कालीन नेतृत्वाचा होता. महाराष्ट्रातली सामान्य जनता, कामगार, मध्यमवर्गीय यांनी या विरोधात अभूतपूर्व लढा दिला. १०५ हुतात्म्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. महाराष्ट्र राज्य निर्मितीचा मंगल कलश

Copyright © 2020 Authors

१ मे, १९६० या वर्षी यशवंतराव चव्हाण यांनी आणला. मराठी भाषिकांचे महाराष्ट्र हे राज्य अस्तित्वात आले. मात्र डांग, उमरगाव,निपाणी, कारवार, बेळगाव हा मराठी प्रदेश मात्र परप्रांतात राहिला.ला भाग पाडले. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची, 'माझी मैना गावावर राहिली' ही छक्कड अजरामर झाली आहे. त्या एका लावणीमध्ये अवघ्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या संघर्षाचे दर्शन आणि दाहकता आपणास जाणवल्याशिवाय राहत नाही.

**कामगार चळवळ**

स्वातंत्र्योत्तर काळात स्वतंत्र भारताच्या सरकारकडून अनेक अपेक्षा या देशातील कामगारांच्या होत्या, वेतन वाढ,कामाचे तास निश्चिती इत्यादी अपेक्षा प्रामुख्याने होत्या.त्यासोबतच कामगार कल्याण विषयक धोरणे व योजना राबविण्यात सरकार अपयशी ठरत होते व उद्योगपती धार्जिणे निर्णय कामगारांवर लागत होते. या सर्व बाबींचा निषेध म्हणून श्रमिकांनी सरकारच्या विरोधात संप, काम बंद आंदोलन, आमरण उपोषण अशी विविध आयुधे वापरून सरकारला प्रभावी कामगार कायदे व धोरणे तसेच योजना राबविण्यासाठी भाग पाडले. सत्तरच्या दशकानंतर महाराष्ट्राचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संदर्भ बदलले.डॉ.दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील कापड गिरण्यांचा संप याच काळात घडून आला.कामगारांच्या या संपात हीमोठ्या प्रमाणात गिरण्यांच्या प्रवेशद्वारांवर धरणे देऊन आंदोलन करत असताना, कामगाराना लढायला बळ कामगार चळवळींनी दिले.या संपाचा परिणाम म्हणून की, इथल्या राजकीय कूट नीतीचा डाव म्हणून मुंबईतल्या कापड गिरण्या बंद पडल्या आणि मोठा कामगार वर्ग बेरोजगार झाला. महाराष्ट्राच्या आणि मुंबईच्या इतिहासाला कलाटणी देणारी ही घटना होती. या घटनेनंतरच्या संदर्भाचे आणि गिरणी कामगारांच्या जीवन संघर्षांचे वर्णन कथा, कादंबऱ्या यांच्या सोबत या सामाजिक गीतांमध्येही आल्याचे आपणास दिसून येते.१ महाराष्ट्रातील कामगार चळवळीने बसलेला हा सर्वात मोठा धक्का होता. त्यानंतर कामगार वर्ग मोठ्या प्रमाणामध्ये विभाजित होऊन राजकीय पक्षांच्या विविध संघटनांचे भाग बनल्या. कालांतराने कामगार शक्ती संघटित होऊन शासनावर दबाव गट म्हणून काम करू लागल्या मात्र मूळ उद्देश हा काहीसा बाजूला पडल्याचे आपणास दिसून येते. कामगार संघटनांची व्याप्ती हळूहळू बँक, विमा, शिक्षण, आरोग्य तसेच इतर क्षेत्रांमधील कर्मचारी वर्गापर्यंत वाढली.२ त्या औद्योगिक क्षेत्रावर त्या मर्यादित राहिल्या नाहीत. आजही शोषित कामगारासाठी कामगार संघटना या शेवट आशेचा किरण आहे. मात्र कामगार संघटना आपल्या आपल्या क्षेत्रापुरते मर्यादित राहिल्याने त्यांची शक्ती विभाजित झाल्याचे दिसून येते. आजही देशातील संघटित असंघटित कामगारांचे प्रश्न कामगार संघटना प्रभावीपणे हाताळण्यात यशस्वी ठरल्याचे दिसून येते. कंत्राटी पद्धत राबवून शासन एक प्रकारे सुशिक्षित बेरोजगार व कामगार यांची थट्टा करत आहे.मात्र कोणतीही कामगार संघटना त्याविरोधात आवाज उठवताना प्रकर्षाने दिसत नाही. हे खेदाने म्हणावे लागेल.

**आंबेडकरी चळवळ-**

स्वातंत्र्योत्तर काळात अल्पावधीतच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले.त्यामुळे आंबेडकरी चळवळीला खूप मोठा धक्का बसला. महापरिनिर्वणा च्या अगोदर काही देवकरण अगोदरच आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन एका युगप्रवर्तक चळवळीची पायाभरणी केली होती. मात्र त्यांच्या अकाली जाण्याने चळवळीची खूप मोठी हानी झाली. त्यांच्या भारतीय जनतेला उद्देशून लिहिलेल्या खुल्या पत्राच्या आधारे अनुयायांनी शेड्युल कास्ट फेडरेशन विसर्जित करून भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. अल्पावधीतच रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट निर्माण व तत्कालीन सत्ताधारी पक्षांशी युती करून सत्तेसोबत राहण्याचा प्रयत्न तत्कालीन रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी केली. या काळात आंबेडकरांच्या नंतरची आंबेडकरी चळवळ ही आपल्या संक्रमणाच्या काळातून जात होती.या प्रस्थापित नेतृत्वांनी राजकीय तडजोडी आणि युतीच्या राजकारणात समाधान मानले.त्याच काळात महाराष्ट्रात दलितांवर अनन्वित अत्याचार वाढले होते.प्रस्थापित नेतृत्व ही समाजाच्या मूळ प्रश्नाकडे लक्ष न देता फक्त सोयीचे राजकारण करत आहे ,असा आरोप करत दलित समाजातील तरुणांनी अमेरिकेतील 'ब्लॅक पँथर' या लढाऊ संघटनेच्या धर्तीवर ' दलित पँथर' या लढाऊ विचारांच्या संघटनेची स्थापना केली. आणि अन्याय करणाऱ्यांना त्यांच्या भाषेत उत्तर दिले.यासाठी या संघटनेने महाराष्ट्रभर आपले जाळे तयार केले. अन्याय अत्याचार करणाऱ्या प्रवृत्तींवर या संघटनेने जरब बसवली होती.या संघटनेचे संस्थापक हे कवी, लेखक, गायक, कार्यकर्ते होते. दलित पँथर या चळवळीचे अधिष्ठान हे सामाजिक गीतांनी महाराष्ट्रात तयार केले. याच काळात औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचं नाव देण्याचा ठराव पारित करण्यात आला. या घटनेने मराठवाड्यातील सवर्ण खवळले आणि त्यांनी दलित समाजावर अनन्वित

 ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

अत्याचार केले. दलितांच्या वस्त्या वस्त्या पेटवण्यात आल्या. महिलांवर बलात्कार करण्यात आले.अनेक गावांमध्ये दलित वस्त्यांवर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला.या सर्व परिस्थितीला दलितांनी मोठ्या हिंमतीने तोंड दिले. नामांतराच्या लढ्यादरम्यान निर्माण झालेल्या लढाऊ सामाजिक गीतांनी या लढ्यात ऊर्जा निर्माण केली.

"प्रसंग ताडा...तो हाणून पाडा... जुपा एकीचा गाडा रे...

जळतोय मराठवाडा ...जळतोय मराठवाडा..."

या गीतांनी सामजिक प्रबोधनाबरोबरच चळवळीतील ढोंगी, स्वार्थी आणि पांढरपेशी प्रवृत्तींवर आसूड ओढले.या लढ्यात समाजातील सर्व थरांतील लोक सामील झाले होते. शेवटी १४ जानेवारी, १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर न करता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद', असा नामविस्तार करण्यात झाला. इथून पुढेच नामांतराऐवजी नामविस्तार करण्याची परंपरा सुरु झाली.

### शेतकरी चळवळ-

महाराष्ट्र शेतकऱ्यांच्या शोषणाला आवाज फोडणारा आणि शेतकऱ्यांचा आसूड व्यवस्थेवरती उगारणारा युगप्रवर्तक महापुरुष अजून महात्मा ज्योतिराव फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. ज्योतिरावांनी शेतकऱ्यांचा आसूड या आपल्या ग्रंथामध्ये शेतकऱ्यांच्या दुःखाचे मूळ आणि सावकार, जमीनदार व ब्राह्मणी धर्ममार्तंड यांची अभद्र युती यांची चर्चा केलेली आहे. ही चर्चा भारतातील शेतकरी चळवळींचा पाया ठरते . त्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या खोती प्रथाविरोधी आंदोलन ,कुळ कायदा अशा आंदोलनांमध्ये आपल्याला दिसून येतो. केशवराव जेधे यांच्या पुढाकाराने शेतकरी कामगार पक्षाची स्थापना १३ जून,१९४९ या दिवशी झाली. शेतकरी कामगार पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही शेतकरी आंदोलने प्रामुख्याने झाली त्यामध्ये साम्यवादी व समाजवादी डाव्या पक्षांचा पुढाकार दिसतो.

स्वातंत्र्योत्तर काळात शोषित घटकांपैकी एक महत्त्वाचा घटक आहे शेतकरी. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर शेतीवर आधारित उद्योग आणि शेती यांना बळ देण्याचे काम शासन करत होते मात्र म्हणावे तसे यश मिळत न्हवते. यावेळी महाराष्ट्राच्या क्षितिजावरती शेतकरी संघटनेचा उदय झाला. संघटनेचे संस्थापक होते शरद जोशी. शेतमालाला रास्त भाव मिळवून देणे, शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबवणे, कृषी मूल्य आयोगाची पुनर्रचना करणे, अनुदानाला विरोध डंकेल प्रस्ताव आणि खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार करणे, गरिबी दूर करणे. अशा उद्देशाने शेतकरी संघटना काम करत होती.महात्मा गांधींच्या मार्गाचा अवलंब करून शांततेच्या मार्गाने आंदोलन करणे हे या संघटनेत हे उद्दिष्ट होते प्रसंगी गोळीबाराला ही सामोरं जाण्याचे धैर्य आंदोलन करत असत. संघटनेने कांदा, ऊस, तंबाखू, कापूस, दूध यांना योग्य हमीभाव मिळावा म्हणून आंदोलने केली त्यासोबतच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आंदोलन ही शेतकरी संघटनेमार्फत करण्यात आले. शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न करू तरी नंतरच्या काळात शेतकऱ्यांच्या सामूहिक कृतीचा राजकारणासाठी वापर करून शरद जोशी यांनी केला. शेवटी मूळ उद्देश बाजूला पडल्याने शेतकरी संघटना मागे पडली.१९७० नंतरच्या काळातील शेतकऱ्यांची संघटित आणि सामूहिक कृती म्हणजे धुळे जिल्ह्यातील शहादा तालुक्यामध्ये जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध उभी ठाकलेली श्रमिक संघटनेची चळवळ होय. या अन्यायाचा भिल्ल शेतकरी व शेतमजुरांनी एकजुटीने प्रतिकार केला.१९७२ मध्ये अंबरसिंग यांच्या नेतृत्वाखाली शहाद्याला भू-मुक्ती परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये श्रमिक संघटनेची स्थापना करण्यात आली.आदिवासी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची आणि समस्यांचे प्रभावी मांडणी श्रमिक संघटनेने प्रभावीपणे आणि त्यांना न्याय मिळवून दिला. शेतमजूर, गरीब शेतकरी व स्त्रिया यांना संघटित करण्याचे महत्त्वाचे कार्य या संघटनेने केले. यामध्ये स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. शेतमजुरांचे संप, जंगलाखाली नसणारी जंगल जमीन भूमिहीनांना कसण्यासाठी मिळावी, शेतमजुरांसाठी किमान वेतन निश्चित करावे, आदिवासी शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी त्यांच्या ताब्यात देण्यात याव्या. अशा उद्दिष्टाने संघटना काम करत होती. जमीनदार आणि आदिवासी शेतकरी यांच्यातील संघर्षातील काळाची साक्षीदार श्रमिक संघटना आहे.१९७४ साली श्रमिक संघटना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष मध्ये विलीन करण्यात आली. तरीही निरंतरपणे संघटनेचे कार्य आजही प्रभावीपणे चालू आहे आजही शेतकरी आत्महत्या शेतकरी चळवळ राजकीय पक्षांच्या दावणीला बांधली गेली असल्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर दबावगट निर्माण करू शकत नाही. १९९१ नंतर जागतिकीकरण भारताने स्वीकारले आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देऊ

Copyright © 2020 Authors 

शकेल अशी व्यवस्था निर्माण आपण भारतीय म्हणून अपयशी ठरलो . आज शेतकरी आणि त्यांचे प्रश्न फक्त आर्थिक पॅकेज पर्यंत येऊन थांबतात ही खूप मोठी शोकांतिका आहे.

## स्त्रीमुक्ती चळवळ-

महाराष्ट्रातील पुरोगामी विचारांची जननी मानली महाराष्ट्रातूनच भारताला दिशादर्शक असणारे अनेक पुरोगामी आणि परिवर्तनवादी चळवळी पुढे आल्या. भारतातील स्त्रीवादी चळवळीचे जनक महात्मा ज्योतिराव फुले ठरतात. त्यांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या सोबतीने स्त्रियांच्या प्रश्नांवर स्वातंत्र्यपूर्व काळात लोक लढा उभा केला. त्यामध्ये बालविवाह, जरठ कुमारी विवाह, विधवा विवाह, बाल हत्या प्रतिबंधकगृह , स्त्रियांचे शिक्षण, केशवपन, अशा विविधांगी प्रश्नांना वाचा फोडून समतेचा विचार या देशात पहिल्यांदा पेरला. महात्मा फुलेंच्या दिशा दर्शनावर आधुनिक स्त्रीवादी चळवळी आधारित आहेत. शाहू छत्रपती महाराजांनी आपल्या राज्यामध्ये१९१६ ते १९२० या कालखंडात स्त्रीमुक्तीचे अनेक कायदे पारित केले. त्यामध्ये घटस्फोटाचा अधिकार, पुनर्विवाहाचा अधिकार, देवदासी प्रथा विरोधी कायदा, कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा अशा कायद्यांची निर्मिती त्याच काळात केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या प्रश्नांना व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले. हिंदू कोड बिल ही बाबासाहेबांनी अखिल स्त्री जातीला दिलेली एक अनमोल देणगी आहे. ज्या अन्वये हिंदू स्त्रीला पोटगी, घटस्फोट व पुनर्विवाहाचा अधिकार प्राप्त झाला तसेच वडिलांच्या संपत्ती मध्ये वाटा मिळाला. हिंदू कोड बिलाला झालेला विरोध म्हणून व नेहरूंच्या या धोरणाचा निषेध म्हणून म्हणून बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. मात्र जवाहरलाल नेहरू यांनी हिंदू कोड बिल सलग लागू न करता टप्प्याटप्प्याने लागू केले. आज स्त्रियांना मिळालेले अधिकार हे हिंदू कोड बिलाची देणगी आहे.

१९७२ यावर्षी मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडल्याने महागाई प्रचंड वाढून जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडले. त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण व शहरी भागातील स्त्रियांनी या महागाई विरोधात आंदोलन केले. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. या आंदोलनास मोठी प्रसिद्धी मिळाली. येथूनच महाराष्ट्रामध्ये स्त्रीमुक्ती आंदोलनाची सुरुवात झाल्याचे मानले जाते. या आंदोलनाचे नेतृत्व मृणाल गोरे, अहिल्याबाई रांगणेकर, कमल देसाई, मालती बेडेकर, कृष्णाबाई मोरे यांनी केले.असे असले तरी स्त्री-मुक्ती चळवळीची सुरुवात एकोणिसाव्या शतकात महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुढाकाराने सुरू झालेली आहे.१९७५ नंतर प्रामुख्याने स्त्रियांच्या प्रश्नांवर स्त्री शक्ती एकवटलेली दिसून येते. आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी महिला मंडळ स्थापन झाली.ज्याच्या माध्यमातून आर्थिक विकासासाठी लघु उद्योगांची स्थापना करणे तसेच बचत गट स्थापन करणेअसे प्रयोग झाले. स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचाराचे प्रमाण थांबविण्यासाठी तसेच त्यांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी महाराष्ट्रामध्ये अनेक स्त्रीवादी संघटनांची निर्मिती यामध्ये प्रामुख्याने स्त्री मुक्ती संघटना,नारी समता मंच, क्रांतिकारी महिला संघटना, स्त्री आधार केंद्र, महिला दक्षता समिती संघटना, भारतीय महिला फेडरेशन, समाजवादी महिला सभा, जनवादी महिला संघटना, या संघटनांचा समावेश होता. चळवळीची व्याप्ती वाढत असल्याने राजकीय पक्षांनीही ही आपल्या या महिला विभागाची ची सुरुवात केली. या चळवळीच्या आंदोलनामुळे हुंड्या सारख्या निर्बंध घालणारा हुंडाविरोधी कायदा अस्तित्वात आला. त्यासोबतच स्त्रियांवर होणारे अत्याचार, स्त्रियांचा व मुलींचा होणारा व्यापार, लैंगिक छळवणूक, देवदासी प्रथा अशा विविध प्रश्नांना हात घातला. या चळवळीमुळेच महाराष्ट्रामध्ये महिला धोरणाची निर्मिती झाली तसेच महिला आरक्षणाची अंमलबजावणी पंचायत राज व्यवस्थे मध्ये यशस्वीपणे करण्यात आली. याकामी तत्कालीन मुख्यमंत्री शरदराव पवार यांनी मोलाची कामगिरी बजावली. स्त्रीवादी चळवळीच्या रेट्यामुळे महाराष्ट्रामध्ये आणि स्त्री विरोधी कायदे बदलले गेले.७३वी घटना दुरुस्ती नंतर पंचायतराज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना ३० टक्के आरक्षण मिळाले त्यानुसार स्त्री घराबाहेर पडून राजकारणात आपला ठसा उमटवू लागली.

## आदिवासी चळवळ-

या देशातील मूळनिवासी असणाऱ्या आदिवासींची गणना शोषित वर्गामध्ये फार पूर्वीपासून केली. ब्रिटिशांनी जल, जंगल आणि जमीन या तीन महत्त्वाच्या घटकांकडे व्यापारी दृष्टिकोनातून पाहिले आणि साम्राज्यविस्तार करण्याच्या हेतूने कायदे करून जंगलाची मक्तेदारी आपल्या ताब्यात घेतली. तेथे राहणाऱ्या आदिवासी समाजाला चहा, नीळ यांच्या मळ्यामध्ये वेठबिगार म्हणून राबवले. ब्रिटिशांचे हे धोरण म्हणजे आदिवासी समुदायाच्या मानवी हक्कांवर अतिक्रमण होते. त्याविरोधात संथाळ, महादेव कोळी, भिल्ल, गोंड, अशा आदिवासी जमातींनी आवाज उठवला. त्यांचे बंड ब्रिटिशांनी माणूस पणे मोडून काढले .बिरसा

मुंडा यांनी ब्रिटिश सरकारविरोधात उलगुलान नावाची चळवळ उभा केली. त्यातून मोठा विरोध निर्माण झाला. कालांतराने फितुरीमुळे बिरसा मुंडा यांना अटक करून फाशी देण्यात आले. असाच लढा राघोजी भांगरे, तंट्या भिल्ल यांनी देखील दिला. स्वातंत्र्योत्तर काळात ब्रिटिश सरकारची धोरणे शासनाने राबवली व त्यामुळे आदिवासींना प्रचंड संघर्ष करावा लागला आदिवासी चळवळीमध्ये प्रामुख्याने अन्याय, अत्याचार, शोषण, कर्ज, वेठबिगारीपासून संरक्षण, जंगलाचे हक्क, इतरांचे जंगल जमिनीवरती होणारे आक्रमण थांबवणे, जंगलाचा हक्क मिळवणे अशी उद्दिष्टे होती. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी घटनात्मक तरतुदींची ची निर्मिती करण्यात आली. मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आला त्यासोबतच लोकसभा, विधानसभा इत्यादींमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले. ज्या राज्यांमध्ये आदिवासींची संख्या जास्त असेल या राज्यांमध्ये पंचायत राज व्यवस्थेची अंमलबजावणी करण्यासाठीPESA (Panchayat Extension in Scheduled Area ) या कायद्याद्वारे ग्रामसभांना विशेष अधिकार देण्यात आले. तसेच आर्थिक विकासासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले त्यासोबतच पंचवार्षिक योजनांद्वारे विविध कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या. शैक्षणिक सोई-सवलती मध्ये आश्रमशाळांची निर्मिती करून निशुल्क शिक्षण, विद्यावेतन, शिष्यवृत्या, वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी चळवळी यात प्रामुख्याने जल, जंगल, जमीन यांचे हक्क,विस्थापना विरोधात केलेली आंदोलने, संवैधानिक अधिकारांचे रक्षण हे विषय केंद्रस्थानी ठेवून झाल्याचे आपणास दिसून येते. या चळवळींचे नेतृत्व प्रामुख्याने सत्यशोधक, समाजवादी, व साम्यवादी विचारधारा करताना दिसून येतात. स्वातंत्र्यानंतर आदिवासींच्या प्रश्नांकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होताना दिसून आले त्यातून नक्षलवादी चळवळींचा जन्म झाला. आदिवासीबहुल भागांमध्ये विविध प्रकल्प सुरू करण्यात आले. त्यातून या भागातील पर्यावरणास तसेच जनमानसास धोका निर्माण झाला. खनिज उद्योग,धरण बांधणी, अभयारण्यांची निर्मिती तसेच व्याघ्र प्रकल्प अशा अशा अनेक कारणांमुळे गावेच्या गावे विस्थापित झाली. प्रकल्प अस्तित्वात आले मात्र प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाले नाही. त्यामुळे आदिवासी भागांमध्ये प्रामुख्याने प्रकल्पग्रस्तांच्या चळवळी आपणास सर्वाधिक दिसून येतात. उदाहरणार्थ, नर्मदा बचाव आंदोलन.

**साम्यवादी चळवळ-**

जागतिक साम्यवादाच्या तत्वज्ञानाचा प्रणेता म्हणून कार्ल मार्क्स याचे योगदान आपणास परिचित आहे. मार्क्सने शोषितांच्या मुक्तीचा जाहीरनामा मांडला. त्याच्या तत्त्वज्ञानावर जगातील विविध देशांमध्ये हे राजकीय क्रांत्या घडून आल्या. मार्क्सने मांडलेले तत्वज्ञान हे मानवमुक्तीचा तत्त्वज्ञान आहे. भारतामध्ये साम्यवादी विचारधारा ही १९२० ते १९२५या कालखंडात झाली साम्यवादी आणि समाजवादी विचार हे विसाव्या शतकात भारतात पोहोचले त्याचे मुख्य प्रवर्तक एम.एन. रॉय ठरतात. साम्यवादी विचारधारा या देशांमध्ये संघटित विचारधारा म्हणून उदयास येण्यासाठी दहा वर्षांचा कालखंड जावा लागला. स्वातंत्र्योत्तर काळात ट्रेड युनियन, शेतकरी,शेतमजूर व भूमिहीन शेतकरी यांच्या संघटना, महिला संघटना, कष्टकरी, मजूर यांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या संघटना, या प्रामुख्याने समाजवादी व साम्यवादी विचारांच्या आधारावर स्थापन झालेल्या आहेत. शोषितांच्या उत्थानाचा विचार तत्त्वज्ञानामध्ये केंद्रस्थानी ठेवून कृतिशील नियोजनबद्ध कार्यक्रमाच्या आधारे सामाजिक कृती करणे हे साम्यवादी तत्वज्ञानाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारतामध्ये केडर बेस प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फळी साम्यवादी समाजवादी संघटनांमध्ये आपणास दिसून येते. संस्थात्मक सुधारणा घडवण्यामध्ये साम्यवाद यांचे योगदान मोठे आहे. जहालमतवादी व परिवर्तनशील राजकारण हा साम्यवादी चळवळीचा स्वभाव आहे.कम्युनिस्टांनी संघटन शक्ती तयार करत असताना सामाजिक समस्यांना, आणि प्रश्नांना हात घालत असताना सखोल चिंतन करून संघटना बांधणी केली. लोकांना संघटित करण्यासाठी त्यांनी संस्कृती, साहित्य, कला, संकल्पनांची मांडणी, प्रत्यक्ष कृती कार्यक्रम याबाबतीत स्वातंत्र्योत्तर काळात त्यांचे योगदान मोठे आहे.भारतातील मुख्य राजकीय प्रवाहातील पक्षांमध्ये डाव्या पक्षांची मांडणी व शोषण आणि शोषक यांच्यातील सहसंबंधांचे विश्लेषण यामुळे लोकाभिमुख बनलेली दिसून येते.सर्व प्रकारचे दमन व शोषण आधारित विषमता यांची मांडणी प्रत्यक्ष कनिष्ठांच्या कृती कार्यक्रमांमध्ये दिसून येते. असे असले तरी साम्यवादी चळवळींना मर्यादा राहिलेली आहे. भारतातील साम्यवादी चळवळींचे नेतृत्व प्रामुख्याने उच्चवर्णीय राहिलेले असल्यामुळे सहाजिकच भारतातील जात वास्तवाला नाकारण्याचा प्रयत्न साम्यवादी चळवळीकडून झाल्याचा आरोप त्यावर करण्यात आला. जागतिकीकरणाच्या काळात जेव्हा भांडवलशाहीच्या व्याप्ती बदलत असल्याने भारतातील साम्यवादी चळवळीने जातआधारित शोषण व्यवस्था आपल्या अजेंड्यावर घेतल्याचे

ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

चित्र दिसून येते.असे असले तरी साम्यवादी चळवळ ही वेगवेगळ्या रूपाने सामाजिक विषमतेचे प्रश्न ऐरणीवर घेऊन शोषितांची बाजू मांडताना दिसून येते. रणनीतीक दृष्ट्या व्यवस्था परिवर्तन साम्यवादी चळवळीचे प्रमुख उद्दिष्ट असताना आजच्या काळात सत्तेशी संघर्ष करताना दिसून येते. तसेच धन्यवाद चळवळीतील काही गट संसदीय लोकशाही प्रणाली मानत आहे, तर अनेक गटांनी मध्यवर्ती सरकार विरोधात सशस्त्र क्रांतीचा आणि दहशतवादाचा मार्ग स्वीकारल्याचे दिसून येते त्यामुळे साम्यवादी चळवळीतील अंतर्विरोध स्पष्ट दिसून येतो.

१९९१ या वर्षी भारताने आपल्या पारंपारिक अर्थव्यवस्थेला फाटा देऊन जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या वैश्विक मूल्यांचा स्वीकार केला. ही भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना होती.

असे नाही की भारत हा या अगोदरच्या इतिहासात अशा बदलांना सामोरे गेला नव्हता.इतिहासात भारताचे विविध देशांशी व्यापारी, सांस्कृतिक, राजकीय सहसबंध राहिलेले आहेत.मात्र त्याचा भारतीय सामाजिक, सांस्कृतिक, व्यापारी, साहित्यिक, तसेच राजकीय जीवनावर सखोल परिणाम जागतिकीकरणा इतका झाल्याचे फार कमी आढळून येते.मात्र १९९१ जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर भारतीय सामाजिक, सांस्कृतिक, व्यापारी, साहित्यिक, तसेच राजकीय परिवेश बदलले.या वैश्विक बदलाच्या प्रभावाने आमुलाग्र बदल घडून आले पारंपारिक भारतीय सामाजिक, सांस्कृतिक, व्यापारी, साहित्यिक, राजकीय जीवनात बदल झपाट्याने घडून आले त्याची परिणीती म्हणजे हा परिवेश कोलमडून पडला.त्या घुसळणीने भारतीय समाज घटक प्रभावित झाले.त्यांच्या भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक धारणांना मोठा शह बसला. ते परिघाबाहेर फेकले जाण्याची शक्यता निर्माण झाली.नागरीकरणाला मोठ्या प्रमाणात वेग आला. ग्रामीण , शेतीप्रधान जीवन व्यावसायिक जीवन त्यामुळे गंभीरपणे प्रभावित झाले.गावगाड्याची पारंपारिक चौकट मोडून हा शोषित समाज महानगरांकडे उपजीविकेसाठी स्थलांतरित झाला. त्या अगोदर १९७२ साली महाराष्ट्राने सर्वात भीषण दुष्काळ अनुभवला. त्या काळातही मोठ्या प्रमाणात हे शोषित घटक महानगरांमध्ये स्थिरावले. त्याचा सर्वात जास्त मोठा परिणाम या देशातील अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती जमाती, अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर या परिघावरच्या समाज घटकांच्या जीवनावर झाला.

जागतिकीकरण,खाजगीकरण आणि उदारीकरण वैश्विक धोरणांचा स्वीकार केल्यानंतर सरकारने बहुराष्ट्रीय कंपन्यांना सर्व प्रकारच्या सुविधा पुरविणे, त्यांच्यासाठी कायद्याद्वारे सर्व प्रकारच्या संरक्षण पुरवणे बंधनकारक करण्यात आले. सेझसाठी केलेल्या भूसंपादनासाठी केली गेलेली आंदोलने किंवा इतर विविध विषयांवर केली गेलेल्या आंदोलनांमध्येया सामाजिक विषयांचेआणि प्रकल्पग्रस्तांच्या संघर्षाचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसून येते.

**संदर्भ**:

१. बिडवई प्रफुल्ल,भारतातील डाव्या चळवळींचा मागोवा, अनुवाद–मिलिंद चंपानेरकर,
रोहन प्रकाशन,पुणे.३०.प्रथम आवृत्ती –ऑगस्ट,२०१३.

२. कामगार चळवळीचा अग्निबिंदू - मुंबईतला ऐतिहासिक संप आणि डॉक्टर दत्ता सामंत..समीर गायकवाड शनिवार, 16/01/2016.https://aisiakshare.com/node/4773

३. डॉ.पाटील, वा.भा.,महाराष्ट्रातीलचळवळी.(सामाजिक व राजकीय)
प्रशांत पब्लिकेशन, जळगाव ००१.प्रथम आवृत्ती –जुलै २०१४.पृष्ठ १४६.

३ .तत्रैव पृष्ठ.१४६.

४ .डॉ.लिंबाळे,शरणकुमार,दलित पँथर.
दिलीपराज प्रकाशन प्रा,लि.पुणे.३० ,जाने.२००९.

❑❑❑

Copyright © 2020 Authors

ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

# मुस्लीम आरक्षणाचे चर्चाविश्व

**मालेगावकर मो.अलीसाब निजामोद्दीन**

**संशोधक विद्यार्थी**

**राज्यशास्त्र व लोक प्रशासन विभाग**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

EMAIL ID :- malegaonkaraligmail.com

Mobile No. - 9049741447

भारतीय राजकारणात धर्म, जात, वंश, वर्ग आणि भाषा इ. घटकांचा प्रभाव राहिलेला आहे. जात हा भारतीय समाजरचनेचा पाया असून भारतातल्या सर्व धार्मिक (हिंदू, मुस्लीम, ख्रिचन, शीख, बौद्धइ. ) समूहामध्ये जाती आहेत. सैद्धांतिकरीत्या इस्लाम धर्म जाती व्यवस्थेचा पुरस्कार करत नाही. इस्लाममध्ये जाती व जातीय संरचना नाहीत. पण भारतीय मुस्लिमांत मात्र जाती व जातीय संरचना आढळते. मुस्लिमांमधील जातींचा विचार करताना हिंदू धर्म सोडून अन्य धर्मासाठी सामाजिक स्तरीकरणाचा विचार जात या कोटीच्या आधारे करता येऊ शकतो का? जात ही सांस्कृतिक बाब म्हणून पाहता येते कि नाही? जात ही संरचनात्मक आहे का? मुस्लिम धर्मामधील आणि हिंदू धर्मामधील जातींचा अभ्यास एकाच पद्धतीने साम्य व भेदाच्या आधारे करता येऊ शकतो का? भारतीय मुस्लिम समाजात मुस्लिमांचे प्रादेशिक आणि संमिश्र संस्कृतीचे स्वरूप अत्यंत मोठ्या प्रमाणावर आढळून येते. पण जागतिक इस्लामच्या तत्वानुसार मुस्लिमांमध्ये वर्णभेद, उच्च - नीच भाव आणि जातिभेद असूच शकत नाही. जागतिक इस्लाममध्ये जाती व्यवस्था नसली तरीही भारतीय मुस्लिमांमध्ये जातीय व्यवस्था असल्याचे दिसून येते.

जगातील सर्व मुस्लिम समुदाय हा एकजिनसी आणि समान आहे,ही घोषणा जशी जागतिक पातळी वर बरोबर नाही तशीच भारतात ही सत्य असल्याचे दिसून येत नाही. मुस्लिम समाज हा भारतातील इतर दुसऱ्या कोणत्याही समुदाय, जाती, जमाती इतकाच विविधता पूर्ण आणि बहूविध स्वरूपाचा आहे. भारतीय मुस्लिमांच्या मध्येही जागतिक इस्लाम मध्ये असणारे सर्व पंथभेद आहेत. भारतीय समाज रचनेतून देखील काही नवीन पंथ आणि पंथभेद निर्माण झालेले दिसून येतात. भारतीय मुस्लिमांमध्ये केवळ शिया, सुन्नी, सुफी आणि वहाबी इतकेच भेद नसून अहमदिया, कादियानी, मेहंदवी हे पंथ तर सर्वस्वी भारतातच निर्माण झालेले आहेत. याशिवाय इस्माइली, दाऊदी-बोहरा, खोजा, सुलेमानी- खोजा, कच्छी-मेमन हे पंथ देखील केवळ भारतीय मुस्लिमांमध्येच आहेत. तबलिगी जमात आणि जमाते इस्लामी यासारख्या अनेक चळवळी देखील भारतीय मुस्लिम समाजात दिसून येतात. धार्मिक व पंथीय दृष्ट्या भारतातील मुस्लिम समाज एकसंघ नव्हता आणि नाही. भारतातील वेगवेगळ्या मुस्लिम पंथांमध्ये सर्व प्रकारचे संघर्ष व भेदाभेद दिसून येतात. धर्मगुरू, मशिदी, धर्मप्रवचने, धार्मिक आचार-विचार, धर्मशास्त्रे, वैक्तीगत कारभारातील प्रादेशिक भाषा आणि संस्कृतीचा प्रभाव मुस्लिमांतील विविध पंथांच्या चालीरीतींवर पडताना दिसून येतो.

मुस्लीम समाज एकजिनसी मानला जातो. पण मुस्लीम समाज हा जातीत विभागला गेला आहे. मुस्लीम जाती भेदाचा मुख्य पैलू म्हणजे ऐतिहासिक रित्या झालेली मुस्लीम समुदायाची वांशिक आणि जातीय विभागणी होय. मुस्लिमांमधील भेद हे तथाकथित परदेशी मुस्लीम पूर्वजांचे वंश आणि ऐत्तेदेशीय धर्मांतरित मुस्लीम यांच्यात उदयास आलेले दिसून येतात. सुरूवातीला ते अशरफ म्हणजे खास व अजलफ म्हणजे नीच या नावाने ओळखले जाऊ लागले. अशरफामध्ये वंश, आणि जन्म ठिकाण या आधारे प्रमुख चार सामाजिक आणि वांशिक उपगट होते. सय्यद, शेख, मुघल आणि पठाण हे ते गट आहेत. सय्यद आणि शेख यांचे पूर्वज अरब होते. मुघल आणि पठाण यांचे पूर्वज मंगोलि आणि अफगाणी लढवय्ये होते. जे स्वत:ला अशरफ म्हणवून घेत. हे उच्च नागरिक, जमीनदार, धार्मिक नेते, श्रीमंत मुस्लीम इ.स्वत:ला सभ्य कुलीन अभिजन मानत.

अजलफ या गटात कष्टकरी-शेतकरी जनता असल्याने ते कशासाठी ही दावे करू शकले नाहीत. अजलफ मधील सामाजिक क्रमवारी भूतपूर्व जातींच्या वैशिष्ट्यांच्या आधारे ठरवली जाते. सामाजिक उतरंडीच्या व्यवस्थेत तळाशी असणारे लोक कमी दर्जाची, अस्वच्छ कामे करतात. त्यांना खालच्या जातीचे मानले जाई. अजलफांनी शेतकरी, कारागीर आणि सेवा देणारे पारंपारिक

Copyright © 2020 Authors